# पाणीवापर हक्कदारीच्या खरेदी-विक्रीचे निकष विकसित करण्यासाठीच्या दृष्टी निबंधाचा मसुदा

## १. प्रस्तावना

१.१ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमामध्ये जरी ट्रेडींग या संज्ञेची विशिष्ट व्याख्या नमूद केलेली नसली तरी पाण्याच्या हक्कदारीच्या ट्रेडिंगशी (खरेदी-विक्री) संबंधित अनेक तरतुदी अधिनियमामध्ये आहेत. या तरतुदींद्वारे एकंदर पाणीवापराची कार्यक्षमता वाढेल या हेतूने पाण्याच्या हक्कदारीच्या खरेदी-विक्रीला पोषक वातावरण प्राधिकरणाद्वारे निर्मिले जाणे अपेक्षित आहे. 'ट्रेडींग' याचा शब्दकोशातील अर्थ खरेदी किंवा विक्री करणे असा आहे. अशा प्रकारे पाण्याच्या हक्कदारीचे ट्रेडींग म्हणजे पाण्याच्या हक्कदारीची अथवा त्याच्या भागाची पाण्याच्या हक्कदारी धारकाने खरेदी अथवा विक्री करणे होय.

१.२ अधिनियमातील प्रकरण क्र.३, 'प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये आणि कर्तव्ये' यामध्ये पाण्याच्या हक्कदारीच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कलमे आहेत. ती पुढीलप्रमाणे:-

११(झ) पाणी वापराचा हक्कदार असणाऱ्याने वार्षिक किंवा हंगामी तत्वावर पाणी वापराचा हक्क किंवा कोटा यांची खरेदी-विक्री करण्याबाबतचे निकष निश्चित करणे. या निकषांमध्ये इतर गोष्टींबरोबरच पुढील बाबींचा समावेश होईल.

(एक) एकूण मोठया प्रमाणातील पाण्याच्या हक्कांव्यतिरिक्त, इतर हक्क, एखाद्या बाजार यंत्रणेमध्ये वार्षिक किंवा हंगामी तत्वावर, ज्यांचे हस्तांतरण, विनिमय, खरेदी किंवा विक्री करता येईल आणि ज्यांचे प्राधिकरणाच्या नियमांन्वये स्थापित करण्यात आल्याप्रमाणे प्राधिकरणाकडून नियमन व नियंत्रण करण्यात येऊ शकेल असे फलोपभोग हक्क असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) हंगामी किंवा वार्षिक वाटपाद्वारे निर्धारित केलेला, पाण्याच्या हक्कदारांना नेमून देण्यात आलेला पाण्याचा कोटा म्हणजे प्राधिकरणाच्या नियमांद्वारे स्थापन आणि नियंत्रित करण्यात आल्याप्रमाणे एखाद्या बाजार यंत्रणेमध्ये वार्षिक किंवा हंगामी तत्वावर ज्यांचे हस्तांतरण, विनिमय, खरेदी किंवा विक्री करता येईल असे घनमापन पध्दतीने फलोपभोग हक्क असतील.

१.३ अशा प्रकारे प्राधिकरणाने पाणीवापर हक्कांच्या खरेदी-विक्रीसाठी एक नियमन पध्दती प्रस्थापित करणे अधिनियमानुसार आवश्यक आहे. वरील कलम ११ (झ) नुसार निकष निश्चित करण्यासाठी प्राधिकरणाला मदत करु शकतील असे या क्षेत्रातील तज्ञ, अशासकीय संघटना व अन्य भागधारक यांचेकडून त्यांचे दृष्टीकोन/सूचना प्राप्त करुन घेण्यासाठी हा दृष्टीनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

## २. पाणीवापराचे हक्कधारक

२.१ पाणीवापराच्या हक्काची खरेदी-विक्री या विषयाचे विवेचन करण्यापूर्वी अधिनियमानुसार पाणीवापराचा हक्कधारक म्हणजे कोण हे जाणून घेतले पाहिजे. अधिनियमाच्या कलम २(झ) नुसार "पाण्याची हक्कदारी" याचा अर्थ या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता पाण्याचा वापर करण्यासाठी एखाद्या

नदी-खोरे अभिकरणाने दिलेले प्राधिकारपत्र असा आहे. अधिनियमाच्या कलम २(यग) नुसार "पाणीवापर गट" याचा अर्थ, प्राधिकरणाने पाण्याचा हक्क प्राप्त करण्यासाठी व वापरण्यासाठी प्राधिकृत केलेली कोणतीही पाणीवापर संस्था, जलसेवा, औद्योगिक पाणीवापर संस्था, अन्य पाणीवापर संस्था किंवा इतर कोणताही गट असा आहे. अशाप्रकारे पाण्याची हक्कदारी मिळविण्याचा अधिकार असलेली एखादी पाणीवापर संस्था किंवा पाणीवापर गटच फक्त पाणीवापर हक्काची खरेदी-विक्री करु शकतील. पाणी प्रशुल्क भरुन प्रकल्पाच्या कार्यचालन व परिरक्षण खर्चाचा वाटा उचलल्यामुळे पाणीवापर हक्कधारकास फलोपभोग हक्क प्राप्त होऊन पाण्याच्या हक्कदारीद्वारे मिळालेल्या हिश्श्याची खरेदी-विक्री करण्याचा पर्यायाने अधिकार प्राप्त होतो. ज्या शेतकऱ्यांना वैयक्तिकरित्या क्षेत्रफळावर आधारित पाणी दिले जाते आणि ज्यांनी पाणीवापर संस्था स्थापन केलेल्या नाहीत, असे शेतकरी कायदेशीर पाणीवापर हक्कधारक होऊ शकत नाहीत आणि म्हणून ते जरी क्षेत्रफळावर आधारित पाणी प्रशुल्क भरुन कार्यचालन व परिरक्षणाचा खर्च देत असतील तरी त्यांना पाणीवापर हक्काच्या खरेदी-विक्री प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

## ३.० <u>अल्पकालीन (spot) विरुध्द दीर्घकालीन खरेदी-विक्री :-</u>

येथे दोन मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे. पहिला म्हणजे पाण्याची हक्कदारी आणि कोटा हे घनमापन पध्दतीवर आधारित आहेत. जरी पाण्याची हक्कदारी आणि कोटा निश्चित करण्याचे सूत्र अगोदरच विहित करता येणे शक्य असले तरी पाण्याची प्रत्यक्ष उपलब्धता ही पावसाळयानंतर जलाशयात होणाऱ्या प्रत्यक्ष साठयावर अवलंबून असते. म्हणून घनमापनावर आधारित कोटयाचे प्रमाण ऑक्टोबर ते जून या कालावधीत निश्चित करता येणे शक्य असून कालावधीनुसार त्यात बदल होईल. यास्तव दीर्घकालीन खरेदी-विक्री सध्यातरी अवघड आहे, कारण तद्नुरुप कोटयाच्या खरेदी-विक्रीशिवाय होणारी पाण्याच्या हक्कदारीतील खरेदी-विक्री ही निव्वळ कागदोपत्री खरेदी-विक्री असेल. दुसरा मुद्दा म्हणजे, कायद्यातील ही बाब अगदी स्पष्ट आहे की, पाण्याची हक्कदारी आणि कोटा यांची खरेदी-विक्री ही दीर्घकालीन तत्वावर न करता फक्त हंगामी अथवा वार्षिक तत्वावर केली जावी. विक्रेय वस्तुंची दीर्घकालीन उपलब्धता ही अनिश्चित असल्याने आणि खरेदी-विक्री ही हंगामी अथवा वार्षिक तत्वावर करण्यास परवानगी देऊन कायद्याने ही बाब मान्य केली असल्याने हे स्पष्ट दिसते की, दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीच्या आरंभी केवळ अल्पकालीन बाजारासाठी नियमबध्द पध्दती करता येणे शक्य आहे.

## ४.० <u>एका प्रवर्गातून दुसऱ्या प्रवर्गात विरुध्द प्रवर्गांअंतर्गत खरेदी-विक्री:-</u>

राज्य शासन क्षेत्रीय (sectoral) वाटप म्हणजे शेती, उद्योग आणि घरगुती या पाणीवापराच्या तीन प्रवर्गांसाठी पाणीवाटप करते. वापराच्या प्रत्येक प्रवर्गामधील पाणीवापराच्या हक्कांचे वितरण नदी खोरे अभिकरणाकडून केले जाते. एखाद्या वापरकर्त्यांच्या पाण्याच्या हक्कदारीतील बदलामुळे जर अन्य वापरकर्त्यांच्या पाण्याच्या हक्कदारीत बदल होत असेल तर अशा बदलासाठी प्राधिकरणाची पूर्वानुमती आवश्यक आहे. तसेच जर एखाद्या वापरकर्त्यांने त्याच्या पाणीवापराचा प्रवर्ग वरच्या प्राधान्यक्रमाचा असल्याचा आधार घेऊन पाण्याच्या हक्कदारीत बदल करण्याची मागणी केली असेल तर अशा

बदलाच्या अर्जावरील कार्यवाही अधिनियमातील कलम ११(ज) (दोन) चे अधिनस्त राहील व त्यानुसार समग्र कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील.

खरेदी-विक्रीतील गुंतागुंत ही बाब थोडावेळ बाजूला ठेवली तरी प्रवर्गीय पाणीवाटप हा मोठा वादाचा विषय होऊ शकतो. उदाहरणार्थ, जर पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर करणाऱ्या एखाद्या औद्योगिक पाणीवापरकर्त्यांने एखाद्या पाणीवापर संस्थेस जादा रक्कम देऊ केली व पाणीवापर संस्थेस तिच्याकडील विक्री-योग्य कोट्याची विक्री करणे अधिक आकर्षक वाटले तर पीकक्षेत्रावर प्रतिकूल परिणाम होऊन त्याचा फक्त कृषी उत्पादनावरच नव्हे तर शेती व्यवसायावर दीर्घकालीन परिणाम संभवतो. तथापि, यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन लाभदाई परिणाम होतील असाही युक्तीवाद केला जाऊ शकतो. मात्र अशा प्रकारचे लक्षणीय बदल अल्पावधीत पुढे रेटणे व्यवहार्य ठरणार नाही. कारण अशा प्रकारच्या आर्थिक संरचनेमुळे संभाव्य बाधीत लोकांकडून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होऊ शकते. म्हणून एका प्रवर्गातून दुसऱ्या प्रवर्गातील खरेदी-विक्री सद्य:स्थितीत विचारात घेणे अडचणीचे होणार आहे. परिच्छेद ५.२ मध्ये ह्या मुद्याचे तपशीलवार विवेचन करण्यात आले आहे.

## ५.० खरेदी-विक्रीची प्रस्तावित व्याप्ती व कक्षा:-

५.१ ठोक पाणी पुरवठयासाठी प्रकल्प अभिकरणाबरोबर करारनामा करणाऱ्या नगरपालिका आणि औद्योगिक वसाहती यासारखे बिगर सिंचन वापरकर्ते जरी पाणीवापराचे हक्कदार असले तरी प्रवर्गाअंतर्गत खरेदी-विक्रीच्या प्रक्रियेतून त्यांना खालील कारणास्तव कक्षेबाहेर ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

(अ) बिगर सिंचनासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचे परिमाण सिंचनाच्या (८०% हून जास्त) तुलनेत अगदी कमी (२०% हून कमी ) आहे.

(ब) बिगर सिंचनासाठी अतिरिक्त पाण्याची गरज ही दीर्घकालीन अथवा कायमस्वरुपी असते. उदा. वाढत्या लोकसंख्येची गरज भागविण्यासाठी नगरपालिकेची पाण्याची गरज अथवा विस्तार करण्याचे नियोजन असलेला औष्णिक ऊर्जा प्रकल्प. अशा मागण्या वार्षिक अथवा हंगामी तत्वावरील खरेदी-विक्रीतून भागविल्या जाणे शक्य होणार नाही कारण त्याशी आर्थिक गुंतवणुकीबाबतचे निर्णय निगडीत असतात. सिंचनामध्ये पिकांची पाण्याची गरज ही हंगामी अथवा वार्षिक स्वरुपाची असते आणि हे अल्पकालीन खरेदी-विक्रीच्या संकल्पनेशी मिळते-जुळते आहे.

(क) खरेदी-विक्री ही पाणीवापर कार्यक्षमता वाढविण्यासाठी तसेच पाण्याच्या उत्पादन क्षमतेतील वाढीची हमी देण्यासाठी आहे. कृषीक्षेत्रात बिगर सिंचन शेतीच्या तुलनेत सिंचित शेतीची उत्पादकता भरीव असते. तसेच सिंचित तृणधान्यांच्या तुलनेत सिंचित नगदी पिकांची उत्पादकता अधिक असते. कृषि क्षेत्रात कमी उत्पादकतेकडून जास्त उत्पादकतेसाठी पाण्याचा वापर करणे सध्या शक्य आहे, तथापी बिगर सिंचन क्षेत्रात सध्या असा किफ़ायतशीर वाव दिसून येत नाही.

५.२ कालव्याचे सदोष प्रचालन व कालव्याच्या वरच्या भागातील लाभधारकांकडून घेण्यात येणारे जास्त पाणी यामुळे कालव्याच्या शेवटच्या भागातल्या शेतकऱ्यांना सर्वसाधारणपणे त्यांच्या पाण्याच्या पूर्ण

हक्कदारीपासून वंचित केले जाते. विषमता असणाऱ्या अन्य सस्थांप्रमाणेच पाणीवापर संस्थामधे सुद्धा स्त्रोताजवळ असणाऱ्या सुरुवातीच्या शेतकऱ्यांचे वर्चस्व रहाते व परिणामी शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना अन्याय्य वागणूक मिळणे यासारख्या बाबींनी या संस्था ग्रस्त असतात. महत्वाचे म्हणजे, कालव्याच्या शेवटच्या भागातील शेतकऱ्यांनी कार्यक्षमतेने पाणी वापरल्यावर बचतीच्या पाण्यामधून त्यांना त्याची रोख भरपाई होणेसाठी खरेदी-विक्री ही एक सुवर्ण संधी आहे.

५.३ राज्याकडून सिंचन प्रकल्पांचे कृषि उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी मोठया गुंतवणूकीद्वारे नियोजन केले जाते. जर सिंचन पाणीवापरकर्त्यांना बिगर सिंचन पाणीवापरकर्त्यांसाठी पाणी विकण्याची मुभा देण्यात आली आणि पाणी हे संपूर्णतः आर्थिक संसाधन समजून त्याचे व्यापारीकरण करण्यात आले तर सिंचन प्रकल्पाचा उद्देशच संपुष्टात येईल. खरेदी-विक्रीमुळे सिंचन प्रकल्पाचा सामाजिक उद्देश असफल होता कामा नये. परिणामी 'प्रत्येक थेंबातून जादा पीक' मिळायला हवे. पाणीवापराची कार्यक्षमता सुधारण्यासाठी देखील खरेदी-विक्री सहाय्यभूत होईल, कारण वाचवलेल्या पाण्याची आर्थिक मोबदल्याच्या बदल्यात विक्री करणे शक्य होईल. हे विचारात घेऊन खरेदी-विक्री ही फक्त कृषी क्षेत्रासाठीच मर्यादित करण्यात येऊन तसेच ती एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रातील खरेदी-विक्रीसाठी किंवा बिगरसिंचन वापराकडून अन्य क्षेत्रात आणि बिगर सिंचन वापराअंतर्गत लागू न करण्यातच दूरदर्शीपणा आहे.

## ६.० <u>खरेदी-विक्री व्यवहार्य ठरेल अशा सिंचन प्रकल्पांचे प्रकार:-</u>

६.१ लघुसिंचन प्रकल्पांमध्ये साधारणतः एक पाणीवापर संस्था असते. जरी या पाणीवापर संस्थेला जलाशयातून पाणी उपसा करणाऱ्या पाणी वापरकर्त्यांबरोबर खरेदी-विक्री करणे तांत्रिकदृष्टया शक्य असले तरी अशा खरेदी-विक्रीचे परिमाण खूपच कमी असेल. त्यामुळे पाणीवापर हक्कदारी कार्यक्रम पूर्णतः अंमलात आणला जात असून यंत्रणेची पुनर्स्थापना पूर्ण करुन ती पाणीवापर संस्थेला हस्तांतरीत करण्यात आलेली आहे, अशा ४ किंवा ५ पाणीवापर संस्था असलेल्या मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पांमध्ये अथवा बृहत् लघु प्रकल्पांमध्ये खरेदी-विक्री सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. खरेदी-विक्री कार्यान्वित करण्यासाठी असे थोडे पथदर्शी प्रकल्प निवडण्यात येतील.

६.२ पाणीवापर हक्कदारी कार्यक्रम हा फक्त रब्बी व उन्हाळी हंगामासाठी अंमलात आणला जात असल्याने नदीखोरे अभिकरणाने प्रत्येक पाणीवापर संस्थेस १५ ऑक्टोबर रोजीच्या प्रत्यक्ष पाणी साठयावर आधारित पाणी वापराची हक्कदारी अथवा कोटा निश्चित करुन दिल्यानंतरच खरेदी-विक्री ही या दोन हंगामापुरती अंमलात आणण्याचे प्रस्तावित आहे.

## ७.० <u>नदी खोरे अभिकरणाची भूमिका व प्रस्तावित दृष्टीकोन:-</u>

(i) नदी खोरे अभिकरण प्रथमतः पाणीवापर संस्थांनिहाय अनुज्ञेय पाणीवापराची हक्कदारी निश्चित करील.

(ii) सिंचन परवाना मिळण्यासाठी पाणीवापर संस्था सदस्यांकडून अर्ज मागवील आणि मागणीच्या तसेच हक्कदारीच्या आधारे, पाण्याच्या हक्कदारीचा भाग विकणे अथवा

खरेदी करणे, शक्य आहे काय हे ठरवेल. कोणत्याही पाणीवापर संस्थेला ५०% हून जास्त पाणीवापराची हक्कदारी विकण्यास परवानगी दिली जाणार नाही, म्हणजेच अनुज्ञेय पाणी वापराच्या हक्कदारीपैकी किमान ५०% हक्कदारी पाणीवापर संस्थेने सिंचनासाठी वापरली पाहिजे. त्यामुळे संख्येने अल्पसंख्याक असले तरी शेतकऱ्यांचे हित जपले जाईल व लाभक्षेत्रातील सर्वच शेती पडीक राहणार नाही.

(iii) ज्या पाणीवापर संस्था खरेदी-विक्री करु इच्छितात म्हणजे ज्यांना खरेदी किंवा विक्री करण्याची इच्छा आहे अशांची सर्व माहिती नदी-खोरे अभिकरण ७ नोव्हेंबर अथवा वेळोवेळी निश्चित केलेल्या दिनांकापर्यंत संकलित करतील. नदी-खोरे अभिकरण खरेदी-विक्री संबंधीची अंमलबजावणी जाहीर निविदाद्वारे करतील. याबाबतची कार्यपध्दती ही निविदेद्वारे अथवा लिलावाद्वारे होईल. विक्रेती पाणीवापर संस्था आणि विक्रीकरिता उपलब्ध पाण्याचे परिमाण यांची माहिती निविदा किंवा लिलावाच्या कागदपत्रांद्वारे मिळेल. निविदा पध्दतीमध्ये खरेदीची इच्छा असलेल्या पाणीवापर संस्थांकडून बोली मागविली जाईल व ती पारदर्शकरित्या सर्व बोलीदारांसमोर उघडली जाईल. लिलाव पध्दतीमध्ये लिलावप्रमुख उघड लिलावात बोली मागवील. पाणीवापर संस्थेने देऊ केलेल्या पाण्याच्या परिमाणासाठी प्रत्येक वेळी लिलावप्रमुख उघड लिलावात बोली मागवील. पाणीवापर संस्थेने विक्रीसाठी देऊ केलेला कोटा हा सर्वात जादा बोली देणाऱ्याला विकल्याचे समजले जाईल,

(iv) खरेदी-विक्रीनंतर त्याच्याच पुन्हा खरेदी-विक्रीस परवानगी दिली जाणार नाही. तथापि एका हंगामामधील पाणीवापर संस्थांमधल्या देवाण घेवाणीस परवानगी दिली जाईल. यामुळे खरेदी-विक्रीमधील सट्टेबाजी रोखली जाईल व त्याचवेळी पाण्याचा वापर कार्यक्षमतेने होईल.

(v) सर्वात जादा बोली देणाऱ्याला विकण्यात आलेले पाण्याचे परिमाण प्रत्यक्षरित्या त्याला मिळण्याच्या दृष्टीने शक्य आहे याची खातरजमा नदीखोरे अभिकरण बोली पक्की करण्यापूर्वी करील. जर वितरण प्रणालीतील मर्यादांमुळे हे शक्य नसेल तर द्वितीय क्रमांकाच्या जादा बोली देणाऱ्याचा यासाठी विचार केला जाईल. परंतु या करीता सुद्धा वरील प्रमाणे प्रत्यक्ष पाणी मिळण्यासाठीच्या अटीची पुर्तता होणे आवश्यक राहील.

(vi) बोलीमध्ये विकण्यात येणाऱ्या पाण्याची घनमीटरमधील परिमाणाची माहिती नदीखोरे अभिकरण देईल. पायाभूत मूल्य हे प्राधिकरणाने प्रशुल्क आदेशात निश्चित केलेल्या रु. प्रति घनमीटर या घनमापित प्रशुल्काहून कमी नसले पाहीजे.

(vii) यशस्वी बोलीदाराने बोलीतील ५०% रक्कम ही नदीखोरे अभिकरणाकडे ताबडतोब भरली पाहिजे. त्या रकमेतील २% रक्कम प्रक्रिया शुल्क म्हणून कापून घेऊन उर्वरित रक्कम संबंधित पाणीवापर संस्थेला दिली जाईल.

(viii) नदीखोरे अभिकरणाने आवश्यक त्या पाणीवापराच्या हक्कदारीचे वाटप केल्यावर म्हणजेच हंगाम संपल्यावर उर्वरित रक्कम बोलीदाराकडून घेऊन अदा केली जाईल.

(ix) बोलीत भाग घेऊ इच्छिणारी एखादी पाणीवापर संस्था जर पूर्वीच्या प्रशुल्काच्या अदायगीसाठी थकबाकीदार असेल तर प्रथम त्या पाणीवापर संस्थेने बोलीमध्ये भाग घेण्यापूर्वी थकबाकी भरली पाहिजे.

(x) बोलीबाबतची प्रक्रिया संपल्यावर पाणीवापर हक्कदारीतील खरेदी-विक्रीने बदललेल्या व वापरात आणावयाच्या सुधारित अनुज्ञेय पाणीवापर हक्कदारीची माहिती संबंधित पाणीवापर संस्थांना नदीखोरे अभिकरण देईल. त्यानुसार संबंधित पाणीवापर संस्था त्यांचा सिंचन आवर्तन कार्यक्रम नदीखोरे अभिकरणाला कळवील.

(xi) ज्या पाणीवापर संस्थांनी खरेदी-विक्री प्रक्रियेत भाग घेतला नसेल त्यांच्या पाणीवापराच्या हक्कदारीवर कसलाही परिणाम होणार नाही याची खातरजमा नदीखोरे अभिकरणाने या खरेदी-विक्रीच्या अंमलबजावणीमध्ये केली पाहिजे.

(xii) बोलीदाराला अपेक्षित असलेला कोटा त्याने रब्बी अथवा उन्हाळी अथवा दोन्ही हंगामात अंशतः वापरण्यास मुभा राहील. तथापि उन्हाळी हंगामासाठी राखून ठेवलेल्या पाण्याच्या परिमाणात बाष्पीभवन व्यय समाविष्ट असेल व तो बोलीदाराने सोसावयाचा आहे.

(xiii) सुधारित अनुज्ञेय पाणीवापराच्या हक्कदारीपैकी प्रत्यक्ष पाणी वापराच्या परिमाणासाठी नदीखोरे अभिकरण पाणीवापर संस्थेकडून ठोक पाणीवापराचे प्रशुल्क आकारेल.

(xiv) पाणीवापर हक्कदारीच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कोणत्यादी वादासंबंधी म.ज.नि.प्रा. अधिनियमाच्या कलम २२ नुसार प्रथमतः प्राथमिक विवाद निवारण अधिकाऱ्याकडून कार्यवाही केली जाईल. प्राधिकरणाकडे अपीलविषयक कामकाज राहील.